**नि.फौ.ख.क्र.२३०/२०२२**
शासन वि. प्रदिप गोपाळ गायकवाड व इतर
**निशाणी क्र.३३ /क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की —

**माझे नांव** : सत्यजित हिंदुराव गायकवाड,

**वय** : ३५ वर्षे, **धंदा** : खाजगी नोकरी,

**राहणार** : कोंढापुरी, ता.शिरूर जि.पुणे

**<u>सरतपासणी</u> —<u>सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.व्ही. कदम :</u>**

**१.** दिनांक १०/११/२०२१ रोजी मी ग्लॅट सिस्टीम प्रा.लि., कोंढापुरी या कंपनीत सिनीयर इक्झीकेटीव्ह एच.आर. आय.आर. ॲडमिन या पदावर कार्यरत होतो. माझ्या कामाचे स्वरूप हे ग्लॅट सिस्टीम प्रा.लि. या कंपनीचे स्थानिक ठिकाणावरील हाऊस किपींगचे ठेके, सेक्युरीटी आणि कंपनीच्या कायदेविषयक अडचणी सोडविण्याचे काम असे होते. दि. २१/१०/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वा. चे सुमारास ग्लॅट सिस्टीम प्रा.लि., कोंढापुरी या कंपनीच्या गेटसमोरून मला आरोपी क्र.१ यांचा फोन आला होता आणि ते मला फोनवर काही कागदपत्रे दाखवायची आहे असे म्हणाले होते. सदर कंपनीचे सेक्युरीटी यांनी आरोपी क्र.१ यांना गेटपास दिला होता. त्यानंतर आरोपी क्र.१ हे सदर कंपनीची कॉन्फरंस हॉलमध्ये आले होते. त्यावेळी ग्लॅट सिस्टीम प्रा.लि., कोंढापुरी, या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी मिलींद वरधे आणि कोंढापुरी येथील प्रतिष्ठीत नागरीक नामे गजानन गायकवाड आणि योगेश गायकवाड हे तेथे हजर होते. त्यावेळी आरोपी क्र.१ याने त्यांचे गेस्ट हाउस असुन ते तुम्ही भाडयाने घ्या आणि दोन मुलांना कंपनीमध्ये कामाला घ्या आणि कंपनीचा एक ठेका द्या असे म्हणाले. त्यावेळी आम्ही आरोपी क्र.१ यास सांगीतले की, कंपनीचे वरीष्ठांशी बोलुन याबाबतचा निर्णय घेऊ.

**२.** दि.०२/०९/२०२१ रोजी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी मिलींद वरधे यांना आरोपी क्र.१ यांचा फोन आला होता. त्यावेळी आरोपी क्र.१ याने त्यांचे गेस्ट हाऊस असुन ते तुम्ही भाडयाने घ्या आणि दोन मुलांना कंपनीमध्ये कामाला घ्या आणि कंपनीचा एक ठेका दिला तरच कंपनीच्या मालकीच्या रोडचे काम होवू दवु असे म्हणुन धमकी दिली व खंडणीची मागणी केली.

**३.** दि.०८/११/२०२१ रोजी सुमारे दुपारी ०३.३० वा. चे सुमारास आरोपी क्र.१ व २ हे कंपनीच्या गेटवर आले आणि त्यांनी शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. त्यावेळी

आरोपी क्र.१ व २ हे म्हणाले की, कंपनीचे बाहेरचे रोडचे जे काम चालु आहे ते थांबवा. आरोपींनी कंपनीच्या गेटसमोर दगड लावले आणि कंपनीमधील आतील गाड्या बाहेर येण्यास बंद करून टाकले. तसेच आरोपी हे म्हणाले की, आमच्या मागण्या पुर्ण करा अन्यथा आम्ही पेटवुन घेवू. त्यानंतर आरोपींनी कंपनीचे रोडचे काम थांबविले. दि. ०८/११/२०२१ रोजी मला आरोपींचा फोन आला होता. त्यावेळी आरोपी हे मला म्हणाले की, आमच्या मागण्या जोपर्यंत पुर्ण होत नाही, तोपर्यंत रोडचे काम पुर्ण होवू देणार नाही. आरोपी हे फोनवर शिवीगाळ देखील करत होते.

४. दि.०९/११/२०२१ रोजी सुमारे सकाळी ०९.०० वा. च्या सुमारास कंपनीच्या रोडचे काम चालु झाले होते. त्यावेळी आरोपी क्र.२ हे ज्युपीटर कंपनीच्या टु—व्हीलर गाडीवर आले होते आणि त्यांनी सदर टु—व्हीलर ही रोडचे काम चालु असलेल्या जे.सी.बी. मशीनच्या दोन्ही चाकांच्या मधे लावली होती. सदर टु—व्हीलरला पाठीमागील बाजुस नंबरप्लेट नव्हती आणि पुढील बाजुची नंबरप्लेट अर्धवट तुटलेली होती. मी माझे वरिष्ठांना फोन करून रोडचे काम थांबवल्याचे कळविले होते.

५. दि.१०/११/२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वा. चे सुमारास मी शिक्रापुर पोलीस ठाणे येथे गेलो आणि आरोपींविरूध्द फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील संपुर्ण मजकुर हा खरा बरोबर आहे. सदर फिर्याद यास **निशाणी क्र.पी.—३४** देण्यात आली. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील संपुर्ण मजकुर हा खरा बरोबर आहे. सदर प्रथम खबर अहवाल यास **निशाणी क्र.पी.—३५** देण्यात आली. मला सदर फिर्याद देणेकामी कंपनीचे संचालक नामे संदीप सावंत यांनी दि.०९/११/२०२१ रोजीचे पत्र दिले होते. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर संदीप सावंत यांची सही असुन ते माझे कंपनीचे वरिष्ठ असल्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. सदरचे पत्र त्यांनी मला फिर्याद दाखल करणेकामी दिलेले आहे. सदर पत्र यास **निशाणी क्र.पी.—३६** देण्यात आली. दि. २१/१०/२०२१ रोजीचा आरोपी क्र.१ यांचा कंपनीमध्ये भेटण्यासाठी देण्यात आलेला व्हीजिटर पास दाखविण्यात आला. त्यावर माझी व आरोपी क्र.१ याची सही असुन त्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. सदर व्हीजिटर पास यास **निशाणी क्र.पी.—३७** देण्यात आली. सदरची घटना ही ग्लॅट सिस्टीम प्रा.लि. कोढापुरी, या कंपनीच्या मालकीचा गट क्र.

३२१/२ यामध्ये घडली होती. गट क्र.३२२/१, ३२२/२/ब, ३२४/१ आणि ३२४/२ या गटामध्ये ग्लॅट सिस्टीम प्रा.लि. कोंढापुरी ही वसलेली आहे.

**६.** फिर्याद दिल्यानंतर पोलीस घटनास्थळावर दि.१०/११/२०२१ रोजी साधारणत: रात्री ०९.०० वाजता आले होते. त्यावेळी पोलीसांना मी घटनास्थळ दाखविले होते आणि त्यांनी घटनास्थळावरून पांढ—या रंगाची एक ज्युपीटर गाडी आणि माझ्याकडून सि.सी.टी.व्ही. फुटेज हे एका पेनड्राइव्हमध्ये घेतले होते. आता मला व्ही.पी.आर. क्र.८/२०२१ मधील एक सॅनडीक्स कंपनीचा पेनड्राइव्ह असलेला बंद लिफाफा दाखविण्यात आला. *(सदरचा लिफाफा हा सध्ययस्थितीत सिलबंद स्वरूपात असुन तो फिर्यादी, आरोपी क्र.१, व २ आणि आरोपीचे सन्माननीय विधिज्ञ आणि सरकारी अभियोक्ता यांच्या समक्ष खुल्या न्यायालयात फोडण्यात आला. त्याबाबत सदर लिफाफ्यावर फिर्यादी, आरोपी क्र.१ व २, व त्यांचे विधिज्ञ आणि सरकारी अभियोक्ता यांची स्वाक्षरी घेण्यात आली.)* सदर लिफाफा यास **निशाणी क्र. पी.३८** देण्यात आली.

**७.** सदर लिफाफा फोडल्यानंतर त्यामध्ये ८ जि.बी. सॅनडीक्स क्रुझर ब्लेड यु.एस.बी.२.० फ्लॅश ड्राइव्ह हा पेनड्राइव्ह मिळुन आलेला आहे. सदर पेनड्राइव्हमध्ये घटनेबाबतचे सि. सी.टी.व्ही. फुटेज असुन ते मी सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी यांना दिलेले आहे. सदर पेनड्राइव्ह हा मी तपासी अधिकारी यांना तपासाकामी दिले असुन तो हाच पेनड्राइव्ह आहे. सदर पेनड्राइव्ह यास **एम.ओ. क्र.१** देण्यात आला. सदर पेनड्राइव्ह मध्ये दि. ०८/११/२०२१ आणि ०९/११/२०२१ रोजीच्या घटनेबाबतचे सि.सी.टी.व्ही. फुटेज यांचा समावेश आहे. सदर पेनड्राइव्ह मधील सि.सी.टी.व्ही. फुटेज बाबतचा साधारणत: २.५ जि. बी. इतका डेटा आहे. ग्लॅट सिस्टीम प्रा.लि. कोंढापुरी या कंपनीचे व्हीडीओ मॉनीटर या सॉफ्टवेअर वरून पेनड्राइव्हमधील सि.सी.टी.व्ही. फुटेज पेनड्राइव्ह मधे कॉपी करून घेतलेले आहे. त्याबाबत मी भारतीय पुरावा अधिनीयम, १८७२ याचे कलम ६५—बी अन्वये प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. आता मला सदरचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले. सदर प्रमाणपत्रामधील संपुर्ण मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर प्रमाणपत्रास **निशाणी क्र. पी.३९** देण्यात आली. माझा संगणकबाबत हार्डवेअर आणि नेटवर्कींग बाबत कोर्स झालेला आहे.

**नि.फौ.ख.क्र.२३०/२०२२**
शासन वि. प्रदिप गोपाळ गायकवाड व इतर
**निशाणी क्र.३३ /क**

८. मी तपासी अधिकारी यांना सदर गुन्ह्याच्या तपासाकामी घटनेबाबतचे सि.सी.टी.व्ही. फुटेज याच्या प्रिंट आउट, सि.सी.टी.व्ही. फुटेज असलेला पेनड्राइव्ह, गेटपास, ही कागदपत्रे दिली होती. मी आरोपी यांना ओळखतो. आरोपी क्र.१ व २ आजरोजी न्यायालयात हजर आहेत. **सरतपास पूर्ण. (न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

श्रवणोत्तर स्विकृत.

DOMALE DATTATRAYA BHAUSAHEB
2025.02.01 17:04:15 +0530

ठिकाण : घोडनदी.
दिनांक : ०१/०२/२०२५.

**(द.भा. डोमाळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता. शिरूर, जि. पुणे.